नियमीत फौजदारी खटला क्र. ८४/२०१५
शासन .वि. दिगांबर
CNR No. MHWS09000247-2015

## <u>निशाणी क्र. १ खालील आदेश</u>

(पारीत दिनांक ०३/०१/२०२२)

**१.** सदरच्या प्रकरणात आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८ (अ), ३२३ सहकलम ३४ अंतर्गत दि. ०५/०७/२०१४ रोजी दोषारोपपत्र ठेवण्यात आले. दोषारोपपत्र दाखल झाल्यापासुन आरोपी सतत गैरहजर आहेत. त्यामुळे आरोपींविरुध्द सन २०१५ पासुन गैरजमानती पकड वारंटचा आदेश पारीत करण्यात आला होता. मात्र आरोपी सतत गैरहजर आहेत. आरोपींविरुध्द वारंवार गैरजमानती वॉरंट काढुनही पोलिसांनी आरोपींविरुध्द सदर वॉरंटची बजावणी केली नाही. त्यामुळे सदरचे प्रकरण मागील सहा वर्षापासुन आरोपींच्या वॉरंटपरती करीता प्रलंबित आहे. वारंवार वॉरंट काढुनही आरोपी हे पोलिसांना मिळुन येत नसल्यामुळे असे दिसुन येते की, आरोपी पोलीसांना नजीकच्या काळात मिळुन येणे शक्य नाही.

**२.** सदर प्रकरण जुने म्हणजे सन २०१५ चे आहे. वारंवार गैरजमानती वारंट काढुनही पोलीस आरोपींना न्यायालयात हजर करण्यास कसुर करीत आहे. आरोपींविरुध्द काढलेल्या वॉरंटवर पोलिसांनी शेरा दिला की, आरोपी दिलेल्या पत्त्यावर राहत नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी हे सदर वारंटची अंमलबजावणी होवु नये म्हणुन फरार झालेले आहेत.

**३.** त्यामुळे सदर आरोपींना फरारी घोषित करुन फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ८२ नुसार आरोपींविरुध्द उद्घोषणेबाबत आदेश पारीत करणे योग्य वाटते. करीता उद्घोषणेची एक प्रत आरोपी ज्या ठिकाणी राहत असेल त्या गावाच्या ठळक ठिकाणी लावावी, उद्घोषणेची एक प्रत आरोपी सर्वसामान्यपणे ज्या घरात राहत असेल त्या घराच्या ठळक ठिकाणी लावावी तसेच उद्घोषणेची एक प्रत न्यायालयाच्या दर्शनीय भागात लावावी. त्याचप्रमाणे आरोपी ज्या ठिकाणी सर्वसामान्यपणे राहत असे तेथील दैनिक वृत्तपत्रात उद्घोषणेची एक प्रत प्रकाशित करावी.

**४.** आरोपींनी दिनांक ०५/०२/२०२२ रोजी अथवा त्या पुर्वी न्यायालयात हजर राहण्याबाबत सदर उद्घोषणेत नमुद करावे. याप्रमाणे आरोपींविरुध्द कार्यवाही करून सदरचे प्रकरण डॉर्मंट फाईलमध्ये ठेवावे. आरोपी हे हजर झाल्यास अथवा

त्यांना पकडुन आणल्यास सदरचे प्रकरण पुन्हा बोर्डावर घेवुन नियमितपणे सुरू ठेवावे.

**५.** आरोपींना फरारी घोषित केल्यामुळे सदरचे प्रकरण बोर्डावरून कमी करून डॉर्मंट फाईल असलेल्या यादीत समाविष्ट करावे. करीता मी खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपींना फरारी घोषित करून फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ८२ नुसार आरोपीविरुध्द उद्घोषणेबाबतची कार्यवाही करावी.

**२.** सदरचे प्रकरण डॉर्मंट फाईलमध्ये ठेवावे.

**३.** आरोपी हजर झाल्यास अथवा त्यांना पोलिसांनी पकडुन आणुन हजर केल्यास सदरचे प्रकरण पुन्हा बोर्डावर घेवुन नियमानुसार चालेल.

Digitally signed by SUDHIR HARIDAS WANKHADE
Date: 2022.01.04 12:11:52 +0530

दिनांक : ०३/०१/२०२२.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
मानोरा, जि. वाशिम